महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

**संचालनालय,लेखा व कोषागारे,मुंबई**

**कस्तुरी बिल्डींग, तळ मजला, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई- ४०० ०२०.**

दुरध्वनी क्र. ०२२-२२८८०१०७ E.mail Id - ad.admin@mahakosh.in संकेतस्थळ :- www.mahakosh.gov.in

---

वाचा: १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५

२. शासन निर्णय वित्त विभाग क्र.११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३,दि.२०.०७.२००१

३. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३,दि.११.०१.२००२

४. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४३/सेवा-३,दि.३१.०८.२००९

५. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/९९/सेवा-३,दि.०१.०४.२०१०

६. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०१.०७.२०११

७. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३,दि.१९.०१.२०१३

८. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३ दि.२३.१२.२०१५

९. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.०८/सेवा-३ दि.११.०५.२०१७

१ शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दि.०२.०३.२०१९

१०. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१.०८.२०१९

११. वित्त विभागाचे पत्र क्र.वेतन-२०१९/प्र.क्र.१२५/सेवा-३, दि.१०.१२.२०१९.

१२. संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/का-१/प्रशा-राप/२४, दि.११.०१.२०२१.

---

क्र.संलेको २०२२/प्रशा-राप/सुसेआप्रयो/कार्यरत ले.अ./1702 दिनांक :- 08 DEC 2022

**-: आदेश :-**

**विषय** :- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सेवानिवृत्त/कार्यरत लेखा अधिकारी यांना लेखा अधिकारी या संवर्गात कार्यात्मक पदोन्नती देण्यापूर्वी सहायक लेखा अधिकारी या पदावर १० वर्षाची नियमित सेवा पूर्ण झाल्यानंतर तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला/ दुसरा / तिसरा लाभ अनुज्ञेय करणेबाबत.

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यांना १०,२० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वित्त विभागाच्या दि.०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय करण्यात आली आहे.

सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड पे रु.५४००/- या वेतन संरचनेशी समकक्ष) अधिकाऱ्यांना लागू राहील. या योजनेखाली पात्र कर्मचारी / अधिकारी यांना संपूर्ण सेवा कालावधीत, पात्रतेनुसार तीन वेळा, या योजनेचा लाभ मंजूर करण्यात येईल.

सातव्या वेतन आयोगा नुसार वेतन श्रेणीतील सुधारणा तसेच तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि.०१.०१.२०१६ पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे श्री. विलास पांडूरंग नागदिवे लेखा अधिकारी यांना लेखा अधिकारी या संवर्गात कार्यात्मक पदोन्नती देण्यापूर्वी सहायक लेखा अधिकारी या पदावर १० वर्ष नियमित सेवा पूर्ण केली असल्याने श्री. नागदिवे यांचा तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने नुसार लेखा अधिकारी या संवर्गाच्या वेतन श्रेणी चा लाभ सुधारित करण्यात येत आहे.

तथापि, श्री.नागदिवे यांना शासकीय सेवेत रुजू झाल्यापासून सहायक लेखा अधिकारी संवर्गात निवडीने नियुक्ती होण्यापूर्वी कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना यांचा यथास्थिती पहिला लाभ अथवा कार्यात्मक पदोन्नतीचा लाभ मिळाला आहे यास्तव श्री.नागदिवे यांना अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार सदरहू लाभ हा यथास्थिती दुसरा लाभ म्हणून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

त्यानुसार पुढील तक्त्यात नमूद महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा अंतर्गत कार्यरत लेखा अधिकारी यांना तीन लाभांच्या योजनेंतर्गत लेखा अधिकारी संवर्गाच्या सातव्या वेतन आयोगातील पे मॅट्रिक्स स्तर एस -१६ (वेतन संरचना रु.४४९००-१४२४००) वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील खालील नमूद कार्यरत लेखा अधिकारी यांना सहायक लेखा अधिकारी या संवर्गात १० वर्षांच्या नियमित सेवेनंतर तीन लाभांच्या आश्वासित प्रगती योजनेतर्गत लेखा अधिकारी या संवर्गाचा सुधारित लाभ त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.६ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून मंजूर करण्यात येत आहे.**

| अ. क्र | लेखा अधिकाऱ्याचे नांव | शासन सेवेत रूजू दिनांक | सहायक लेखा अधिकारी झाल्याचा दिनांक | सुधारित आ.प्र.यो. नुसार सहायक लेखा अधिकारी पदावर १० वर्षे पुर्ण झाल्याचा दिनांक | तीन लाभांच्या योजनेनुसार दुसरा लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. विलास पांडूरंग नागदिवे लेखा अधिकारी, वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालय,अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई. | ०७.०४.१९९४ | २०.१२.२००६ | २०.१२.२०१६ | २०.१२.२०१६ |

अटी व शर्ती :

१ सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभामुळे संबंधित अधिकारी वर्गाच्या जबाबदारी व कर्तव्यांमध्ये वाढ होत नसली तरी त्यांना संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतूदींच्या अधीन राहून नियमित पदोन्नती प्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतन निश्चितीचा लाभ मिळेल. या योजनेतंर्गत वरिष्ट वेतन संरचना दिल्यानंतर वेतन निश्चिती नियमित पदोन्नती प्रमाणे होईल. मात्र त्याच वेतन संरचनेत नियमित /कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.

२ या योजनेतंर्गत पहिला, दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर भविष्यात संबंधितांना लाभ अनुज्ञेय नसल्याचे आढळून आल्यास सदरचा लाभ काढून घेण्यात येईल. तथापि अशा लाभांची वसुली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधितांची वेतन निश्चिती ही त्यांना जणु काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम १२ च्या तरतूदीनुसार करण्यात येईल.

३ या आदेशान्वये कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१०८२/ सीआर-११००/ (एक)/ एसईआर-३, दिनांक ०६/११/१९८४ वित्त विभाग, शासन परिपत्रक वेपूर- २०१९/ प्र.क्र.८/

सेवा-९ दि.२०/०२/२०१९ नुसार वेतननिश्चितीचा विकल्प द्यावयाचा असल्यास तो त्यांनी हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांका पासून एक महिन्याच्या आत संबंधित कार्यालय प्रमुखांकडे सादर करावा.

४ संबंधित कार्यालय प्रमुखांनी वरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीच्या पदाच्या वेतनसंरचनेतील वेतननिश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पा नुसार करून,त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक व वेतन संरचनेनुसार देण्यांत यावा.

सदरचे आदेश संचालनालयाच्या https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीसाठी कार्यालय प्रमुख यांनी संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरावी.

(वैभव राजेघाटगे)
संचालक
संचालनालय, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत :-
१. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई
२. उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ०३२
३. सहसंचालक, लेखा व कोषागारे (सर्व)
४. आदेशातील नमूद लेखा अधिकारी यांचे विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५. कोषागार अधिकारी , कोषागार कार्यालये (सर्व)
-/यांना सूचित करण्यात येते की, त्यांच्या कोषागार कार्यालय अंतर्गत निवृत्ती वेतन/ कुटुंब निवृत्तीवेतन घेणा-या उपरोक्त अधिका-यांच्या निदर्शनास सदर आदेश आणून, त्यांचे निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन सुधारीत करण्याबाबत मार्गदर्शन करावे.
६. संबधित अधिकारी यांना त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत.
७. संबधित अधिकारी यांची वैयक्तिक नस्ती.
८. निवड नस्ती.